महा मेट्रो

महा मेट्रो
PUNE METRO

# विकासाला गती देणाऱ्या नव्या मार्गिका

वनाज ते चांदणी चौक – मार्गिका २अ

रामवाडी ते विठ्ठलवाडी – मार्गिका २ब

खराडी ते खडकवासला – मार्गिका ४

नळ स्टॉप ते माणिकबाग – मार्गिका ४अ



शाश्वत 〉 वेगवान 〉 सुरक्षित 〉

शहरी गतिशीलता

पुणे मेट्रो – टप्पा II

# दैनंदिन प्रवासासाठी
# आधुनिक पर्याय

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो)** यांचा पुणे मेट्रो प्रकल्प ही आधुनिक, वेगवान, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे, प्रवासाचा वेळ वाचवणे आणि पुण्याच्या आधुनिक व एकात्मक सुसंलग्न शहरी विकासाला गती देणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

वेगाने विकसित होणाऱ्या पुणे शहरासोबत वाहतूक कोंडी, प्रवासाचा वाढता कालावधी आणि प्रदूषण यांसारखी आव्हानेही वाढत आहेत.

या पार्श्वभूमीवर, नव्या मेट्रो मार्गिका पुण्याच्या दैनंदिन प्रवासाला अधिक वेगवान, सुरक्षित, सुलभ आणि शाश्वत बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

- वेगवान आणि विश्वासार्ह दैनंदिन प्रवास
- वाहतूक कोंडी व प्रवासाच्या वेळेत मोठी घट
- सुरक्षित, आरामदायी आणि कार्यक्षम वाहतूक
- पर्यावरणपूरक आणि शाश्वत गतिशीलता
- पुण्याच्या स्मार्ट शहरी विकासाला चालना









**वनाज ते चांदणी चौक – मार्गिका २अ**
**रामवाडी ते विठ्ठलवाडी – मार्गिका २ब**
**खराडी ते खडकवासला – मार्गिका ४**
**नळ स्टॉप ते माणिकबाग – मार्गिका ४अ**



# मार्गिकांची विकासगाथा

## विविध जीवनशैली, प्रगती आणि संधींना **जोडणाऱ्या मार्गिका**

### टप्पा I — (पूर्णतः कार्यान्वित)

| पर्पल मार्गिका | अक्वा मार्गिका |
|---|---|
| पीसीएमसी – स्वारगेट (उन्नत + भूमिगत) | वनाज – रामवाडी (उन्नत) |
| १७.५३ कि.मी. \| १४ स्थानके | १५.७५ कि.मी. \| १६ स्थानके |

**एकूण पूर्तता खर्च: १३,६५६.२२ कोटी**

### टप्पा I — विस्तारित मार्गिका (बांधकामाधीन)

| | |
|---|---|
| पीसीएमसी – भक्ती शक्ती (उन्नत) | स्वारगेट – कात्रज (भूमिगत) |
| ४.७८ कि.मी. \| ४ स्थानके | ६.०६ कि.मी. \| ५ स्थानके |

**एकूण पूर्तता खर्च: ४,५१७.८२ कोटी**

### टप्पा II (बांधकामाधीन)

| | |
|---|---|
| वनाज – चांदणी चौक (उन्नत) | रामवाडी – विठ्ठलवाडी (उन्नत) |
| १.१२ कि.मी. \| २ स्थानके | ११.६३ कि.मी. \| ११ स्थानके |

**एकूण पूर्तता खर्च: ३,६२६.२४ कोटी**

| | |
|---|---|
| खराडी – हडपसर – स्वारगेट – खडकवासला (उन्नत) | नळ स्टॉप – वारजे – माणिकबाग (उन्नत) |
| २५.५२ कि.मी. \| २२ स्थानके | ६.१२ कि.मी. \| ६ स्थानके |

**एकूण पूर्तता खर्च: ९,८५७.८५ कोटी**




### सूची

| पूर्णतः कार्यरत मार्गिका | | |
|---|---|---|
| | पर्पल मार्गिका | पीसीएमसी ते शिवाजीनगर (उन्नत) |
| | पर्पल मार्गिका | शिवाजीनगर ते स्वारगेट (भूमिगत) |
| | ॲक्वा मार्गिका | वनाज ते रामवाडी (उन्नत) |
| **प्रस्तावित मार्गिका** | | |
| | ऑरेंज मार्गिका | हडपसर ते लोणी काळभोर (उन्नत) |
| | ऑरेंज मार्गिका | हडपसर ते सासवड रोड रेल्वे स्टेशन (उन्नत) |

| बांधकामाधीन मार्गिका | | |
|---|---|---|
| | पर्पल मार्गिका | पीसीएमसी ते भक्ती-शक्ती (विस्तार-उन्नत) |
| | पर्पल मार्गिका | स्वारगेट ते कात्रज (विस्तार-भूमिगत) |
| | ॲक्वा मार्गिका | वनाज ते चांदणी चौक (विस्तार-उन्नत) |
| | ॲक्वा मार्गिका | रामवाडी ते विठ्ठलवाडी (विस्तार-उन्नत) |
| | पिंक मार्गिका | हिंजवडी ते जिल्हा न्यायालय (पीएमआरडीए-उन्नत) |
| | ऑरेंज मार्गिका | खराडी ते खडकवासला (उन्नत) |
| | ऑरेंज मार्गिका | नळ स्टॉप ते माणिक बाग (उन्नत) |

| इतर | |
|---|---|
| | इंटरचेंज |
| | डेपो |
| | भारतीय रेल्वे मार्ग |
| | नदी/तलाव |
| | रेल्वे स्टेशन |
| | पुणे विमानतळ |

मार्गिका ज्या पुण्याच्या विविध
**जीवनशैलींना, रोजगार केंद्रांना, शैक्षणिक संस्था**
आणि भविष्यातील विकास क्षेत्रांना जोडतात.

# मार्गिका २ चा विस्तार

## विस्तारित जोडणी, गतिमान प्रवास

### मार्गिका २अ

**वनाज ते चांदणी चौक**

पश्चिम पुण्याची कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करणारी मार्गिका

#### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- **१.१२ कि.मी.** मेट्रो मार्ग विस्तार
- **२** नवीन मेट्रो स्थानके
- पूर्णतः उन्नत मेट्रो मार्गिका
- विद्यमान अक्वा मार्गिका (मार्गिका २) चा विस्तार
- पश्चिम पुण्यातील प्रथम व अंतिम टप्प्यातील प्रवास सुविधा अधिक सक्षम



#### प्रमुख फायदे

- पश्चिम पुण्यात अधिक वेगवान प्रवास
- चांदणी चौक परिसरातील वाहतूक कोंडीत घट
- निवासी आणि व्यावसायिक केंद्रांपर्यंत अधिक सुलभ पोहोच

### मार्गिका २ब

**रामवाडी ते विठ्ठलवाडी**

पूर्व पुण्याला अधिक सक्षमपणे जोडणारी मार्गिका

#### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- **११.६३ कि.मी.** मेट्रो मार्ग विस्तार
- **११** नवीन मेट्रो स्थानके
- पूर्णतः उन्नत मेट्रो मार्गिका
- प्रमुख निवासी, व्यावसायिक आणि आय टी केंद्रांना जोडणारी मार्गिका
- पूर्व पुण्याच्या शाश्वत शहरी विस्ताराला चालना



#### प्रमुख फायदे

- पूर्व पुण्याची कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम
- प्रवासाचा वेळ आणि वाहतूक कोंडीत घट
- आय टी व इतर महत्त्वाच्या केंद्रांपर्यंत सुलभ पोहोच
- भविष्यातील विस्तारित मार्गिकांशी थेट जोडणी

पुणेकरांचा दैनंदिन प्रवास
**अधिक वेगवान, सुरक्षित आणि तणावमुक्त**
बनविणारी नवी प्रणाली.



# मेट्रोचे विस्तारित जाळे
## अधिक सक्षम शहरी गतिशीलता

## मार्गिका ४
### खराडी ते खडकवासला
पूर्व पुण्याला दक्षिण-पश्चिम पुण्याशी जोडणारी महत्त्वपूर्ण मार्गिका

### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- **२५.५२ कि.मी.** मेट्रो मार्ग विस्तार
- **२२** नवीन मेट्रो स्थानके
- पूर्णतः उन्नत मेट्रो मार्गिका
- **५.८ कि.मी** एकात्मिक मेट्रो व उन्नत महामार्ग
- **२.६३ कि.मी** एकात्मिक मेट्रो व पुणे महानगरपालिका उड्डाणपूल



#### प्रमुख फायदे
- शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वेगवान जोडणी
- प्रवासाचा वेळ आणि वाहतूक कोंडीत घट
- अखंड बहुविध (multimodal) वाहतूक एकात्मता
- सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक

## मार्गिका ४अ
### नळ स्टॉप ते माणिकबाग
मार्गिका २ शी जोडणी

### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- **६.१२ कि.मी.** मेट्रो मार्ग विस्तार
- **६** नवीन मेट्रो स्थानके
- पूर्णतः उन्नत मेट्रो मार्गिका
- कर्वे रोड आणि वारजेपर्यंत मेट्रो संपर्क विस्तार
- लगतच्या परिसरांसाठी बहुविध वाहतूक व्यवस्थेचे एकत्रीकरण



#### प्रमुख फायदे
- अधिक वेगवान दैनंदिन प्रवास
- रस्त्यावरील वाहतूक कोंडीत लक्षणीय घट
- निवासी परिसरांसाठी अधिक सक्षम कनेक्टिव्हिटी

**एकात्मिक, शाश्वत आणि**
नागरिक-केंद्रित गतिशीलतेतून
सक्षम पुण्याची उभारणी



# अत्याधुनिक
# डबल-डेकर संरचना

मेट्रो आणि उन्नत महामार्ग एकाच एकात्मिक कॉरिडॉरमध्ये विकसित करून पुण्यासाठी अत्याधुनिक वाहतूक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

आधुनिक अभियांत्रिकी, वेगवान बांधकाम तंत्रज्ञान आणि एकात्मिक वाहतूक नियोजनाच्या माध्यमातून हे कॉरिडॉर अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि भविष्यवेधी वाहतूक व्यवस्थेला चालना देतील.



## अभियांत्रिकी वैशिष्ट्ये




### द्विस्तरीय अभियांत्रिकी रचना

स्तर १: सहा-पदरी उन्नत महामार्ग
स्तर २: पुणे मेट्रो



### डबल-डेकर संरचना (मेट्रो आणि उन्नत महामार्ग)

भैरोबा नाला – आकाशवाणी
चांदणी चौक - भुसारी कॉलोनी



### उच्च क्षमतेची स्थानके आणि कनेक्टिव्हिटी

एकात्मिक बहुविध (multimodal) वाहतूक सुविधांमुळे प्रवाशांची ये-जा अधिक सुलभ आणि अखंड

**मेट्रो आणि उन्नत महामार्गाच्या**

अभियांत्रिकी एकात्मतेतून पुण्यासाठी
अधिक वेगवान, सुरक्षित आणि स्मार्ट गतिशीलता



# चालकविरहित
# मेट्रो संचालन



## अधिक अद्यावत तंत्रज्ञान. अधिक सुरक्षित प्रवास. अधिक सक्षम दळणवळण.

चालकविरहित रेल्वे संचालन (Unattended Train Operation – UTO) या अत्याधुनिक तंत्रज्ञानासह शहरी प्रवासाचा अनुभव. स्वयंचलित धावणारी ही मेट्रो प्रणाली प्रवाशांना अधिक सुरक्षित, अद्यावत, कार्यक्षम आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देईल.

## प्रमुख वैशिष्ट्ये

### पूर्णपणे स्वयंचलित व कार्यक्षम संचालन

स्वयंचलित मेट्रो प्रणालीत मेट्रोचे सर्व संचालन हे चालकविरहीत पार पडेल, यामुळे सेवा अधिक सुरळीत, विश्वासार्ह आणि कमी प्रतीक्षेची होईल.

### प्रगत सुरक्षा प्रणाली व अद्यावत दोष शोध यंत्रणा

अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मेट्रोचा वेग, हालचाल आणि अंतर यांचे सातत्याने निरीक्षण केले जाते. तांत्रिक बिघाड स्वयंचलितपणे ओळखून सुरक्षित संचालनास मदत होते.

### स्वयंचलित दरवाजे व फलाट सुरक्षा

स्वयंचलित दरवाजे आणि एकात्मिक सुरक्षा प्रणालींमुळे प्रवाशांना मेट्रोमध्ये चढताना व उतरताना अधिक सुरक्षित आणि सुलभ अनुभव मिळेल.

### सेन्सिटिव्ह एज अँटी-ड्रॅग सुरक्षा प्रणाली

प्रगत सेन्सर्सद्वारे दरवाजात अडकलेले कपडे, साडी, दुपट्टा किंवा बॅगेचे पट्टे ओळखले जातात. अशा वेळी मेट्रोची हालचाल रोखून दरवाजा उघडला जातो, ज्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता वाढते.

### २४ तास केंद्रीय नियंत्रण व सीसीटीव्ही देखरेख

केंद्रीय नियंत्रण कक्षातून मेट्रोच्या संचालनावर चोवीस तास देखरेख ठेवली जाते. तसेच डब्यांमध्ये १००% सीसीटीव्ही निगराणीमुळे प्रवाशांच्या सुरक्षेत भर पडते.

### आपत्कालीन सुरक्षा व संपर्क व्यवस्था

स्वयंचलित आपत्कालीन ब्रेकिंग प्रणाली आणि प्रवासी आपत्कालीन संपर्क यंत्रणा (PECU) यांमुळे अतिरिक्त सुरक्षा मिळते व गरजेच्या वेळी नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांशी थेट संपर्क साधता येतो.

### अधिक प्रशस्त जागा, अधिक आरामदायी प्रवास

चालकविरहित मेट्रोच्या रचनेमुळे प्रवाशांसाठी अतिरिक्त जागा उपलब्ध होऊ शकते. स्वयंचलित संचालनामुळे प्रवास अधिक सुरळीत आणि आरामदायी होतो.

### सर्वसमावेशक व प्रवासीस्नेही सुविधा

महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग प्रवाशांसाठी राखीव आसने, व्हीलचेअर सुलभता आणि सायकल सोबत नेण्याची सुविधा यांमुळे सर्वांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर होतो.

मेट्रो प्रवासाचे भविष्य

**पूर्णपणे स्वयंचलित | सुरक्षित | अद्यावत | सर्वसमावेशक | वेगवान**

UTO (GoA-4) हे बुद्धिमान स्वयंचलन, प्रगत सुरक्षा प्रणाली आणि आधुनिक सुविधांचा संगम असून, दैनंदिन मेट्रो प्रवास अधिक सुरक्षित, सुरळीत, सुविधाजनक आणि जलद बनवते.



# आरामदायी प्रवासासाठी
# आधुनिक आणि कार्यक्षम स्थानके

प्रवेशापासून अंतिम गंतव्यस्थानापर्यंत प्रवाशांच्या प्रत्येक गरजेचा विचार करून स्थानकांची रचना करण्यात आली आहे. बस, फीडर सेवा, पादचारी सुविधा आणि लास्ट-माईल कनेक्टिव्हिटीचे एकत्रीकरण दैनंदिन प्रवास अधिक सुलभ, आरामदायी आणि कार्यक्षम बनवेल.

## स्मार्ट तिकीट प्रणाली


मोबाईल ॲप


डिजिटल किऑस्क


तिकीट व्हेंडिंग मशीन (TVM)


व्हॉट्सॲप ई-तिकीट

## सर्वांसाठी सुलभ प्रवेश


रॅम्प



ब्रेल बटणांसह लिफ्ट


सरकते जिने (Escalator)


स्पर्शसंवेद्य मार्गिका (Tactile Pathways)


दिव्यांग स्नेही रचना

## सुरक्षित आणि आधुनिक स्थानक पायाभूत सुविधा


सीसीटीव्ही निगराणी यंत्रणा


स्वयंचलित एएफसी (AFC) गेट्स


ऊर्जा-कार्यक्षम पायाभूत सुविधा


आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा


डिजिटल सूचना फलक


प्रशस्त, प्रकाशमान आणि हवेशीर परिसर

प्रत्येक मेट्रो स्थानक
**सुरक्षित, सुलभ, आरामदायी**
आणि प्रवासी-केंद्रित अनुभवासाठी



# वेळ, कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक लाभ

## वेगवान प्रवासाची नवी व्याख्या

पूर्वी तासांचा असणारा दैनंदिन प्रवास आता अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ करत तो मिनिटांत पूर्ण करण्याच्या दिशेने पुणे मेट्रोचे महत्त्वपूर्ण पाऊल.

सातत्यपूर्ण, नियोजित आणि तणावमुक्त प्रवासासह पुणेकरांना शहरभर अधिक सुलभ आणि अखंड कनेक्टिव्हिटीचा अनुभव मिळेल.

ही मेट्रो मार्गिका केवळ वेगवान आणि सुलभ प्रवासापुरती मर्यादित नसून, शहराच्या दीर्घकालीन आर्थिक विकासालाही महत्त्वपूर्ण चालना देणारी ठरणार आहे.




**६०% पर्यंत** प्रवासाच्या वेळेत घट

**वेगवान कनेक्टिव्हिटी, निश्चित प्रवास वेळ**
आणि अखंड प्रवास अनुभवातून
दैनंदिन प्रवासात परिवर्तन.



# विकास आणि संधींचा
# नवा मार्ग

## पुण्याला जोडणारी, नव्या संधी घडवणारी मेट्रो.

पुणे मेट्रोचा दुसरा टप्पा शहरातील दळणवळण अधिक सक्षम करून निवासी, व्यावसायिक आणि आर्थिक विकासाला नवी चालना देणार आहे.

**४४.३१ किमी**
मेट्रो मार्गाची एकूण लांबी

**४१**
उन्नत मेट्रो स्थानके

**विकासाच्या नव्या संधी**
पुण्यातील संभाव्य विकास क्षेत्रे




## विकास आणि गुंतवणुकीच्या प्रमुख संधी

**स्थावर मालमत्ता क्षेत्राचा विकास:**
मेट्रो स्थानकांच्या परिसरात निवासी प्रकल्पांचा विस्तार आणि मालमत्तांच्या मूल्यवृद्धीला चालना.

**व्यावसायिक क्षेत्राचा विस्तार**
आयटी पार्क, कार्यालये, किरकोळ व्यापार आणि व्यावसायिक केंद्रांच्या विकासासाठी नव्या संधी.

**वाहतूक-केंद्रित विकास (TOD)**
प्रमुख मेट्रो स्थानकांभोवती निवासी आणि व्यावसायिक सुविधांचा एकात्मिक विकास.

**अधिक सक्षम दळणवळण**
नागरिक, व्यावसायिक आणि कर्मचाऱ्यांसाठी सुलभ प्रवास व विविध भागांशी अधिक चांगली जोडणी.

**सक्षम दळणवळण.**
**विकासाच्या अमर्याद संधी.**

पुण्याच्या आर्थिक प्रगतीला गती देणारी आधुनिक वाहतूक व्यवस्था, नियोजनबद्ध शहरी विकास आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी.

## सक्षम दळणवळण व समृद्धीच्या नव्या संधी.

धोरणात्मक ठिकाणी उभारण्यात येणारी मेट्रो स्थानके शहरी विकासाची नवी केंद्रे ठरतील. त्यातून आधुनिक व्यावसायिक केंद्रे, सुसज्ज निवासी परिसर आणि भविष्यवेधी विकास क्षेत्रांना चालना मिळेल.

- नियोजनबद्ध निवासी विकास क्षेत्रे
- विस्तारणारी व्यापारी व व्यावसायिक केंद्रे
- निवासी व व्यावसायिक सुविधांचा एकात्मिक विकास



नियोजनबद्ध मेट्रो स्थानके आणि
**वाहतूक-केंद्रित विकास क्षेत्रांमुळे**
पुण्यात गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होऊन शहराच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल.



# मेट्रोसोबत
# रोजचा प्रवास अधिक सुलभ

दररोजचे लाखो प्रवासी पुण्याच्या नागरी जीवनाला आकार देतात. प्रत्येकाचा प्रवास अधिक सुलभ आणि सक्षम करण्यासाठी पुणे मेट्रो सज्ज आहे.



## विद्यार्थ्यांसाठी

वाहतूक कोंडीचा ताण न घेता,
दररोज वेळेत शाळा-महाविद्यालयात पोहोचण्याची सुविधा.



## नोकरदार व व्यावसायिकांसाठी

रोजच्या प्रवासात बचत होणारा वेळ,
आता आपल्या प्राधान्यांसाठी.




## कुटुंबांसाठी

शहरभर सुरक्षित, आरामदायी आणि
एकत्रित आनंददायी प्रवासाचा अनुभव.



## व्यवसायांसाठी

सुलभ प्रवास, वाढती वर्दळ
आणि प्रगतीच्या नव्या वाटा.

दैनंदिन प्रवास अधिक **स्मार्ट, वेगवान, विश्वासार्ह**
आणि अखंड बनवत प्रत्येक पुणेकराचे जीवन
अधिक सुलभ करण्याच्या दिशेने.



# गतिशीलतेच्या दिशेने एक पाऊल पुढे

## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड


पुणे मेट्रो भवन (महा मेट्रो), तिसरा मजला, जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकाच्या वर,
न्यायमूर्ती रानडे पथ, शिवाजीनगर, पुणे – 411005
mail.pune@mahametro.org | www.punemetrorail.org
दूरध्वनी: ०२०-२५४०३३५५ / ०२०-२५४०३३५६ (एक्स्टेंशनसाठी कृपया डायरेक्टरी पहावी)


18002705501 Helpline Number

9420101990 व्हॉट्सअ‍ॅप तिकीट बुकिंगसाठी

पुणे मेट्रो मोबाईल ॲप

पुणे मेट्रो वेबसाइट

पुणे मेट्रो तक्रार/सूचना

www.ccmwork.in | 99602 06005